**वरखेडे लोंढे (बॅरेज) मध्यम प्रकल्प, ता.चाळीसगाव, जि. जळगाव- द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- सुप्रमा-२०१५/१३७/( प्र.क्र.१५४/१५)/ म.प्र.**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक :- ०९ मार्च, २०१८.**

**संदर्भ :-** १) तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचे निर्णय क्र. तापाविम/ का.अ./प्रवि-१/ प्रमा-७३/९९, दि.०१/०३/१९९९.
२) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव यांचे निर्णय क्र.तापाविम/कास/प्रवि-१/नवीन प्र.मा.१५/९९, दि.०४/१०/१९९९
३) कार्यकारी संचालक,तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचे निर्णय क्र.तापाविम/कास/प्रशा-१/नवीन प्रमा/१६/२००५, दि.२३/०२/२००५.
४) जलसंपदा विभाग,शासन निर्णय क्र.- सुप्रमा २००८/ ८९६/ (२५८/ २००८)/ म.प्र., दि. १८/०२/२००९.
५) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव यांचे पत्र क्र. तापाविम/प्रशा-५/२१३०/सन २०१६, दि. २७/०४/२०१६.

**प्रस्तावना:-**

वरखेडे लोंढे बॅरेज मध्यम प्रकल्प मौजे वरखेडे बु. या गावापासुन १.५० कि.मी. अंतरावर असून तो गिरणा नदीवर बांधकामावस्थेत असून माती धरणाची लांबी-३२७.६० मीटर, डावा अनुत्सारीत भाग- ५१.४० मीटर, सांडवा (उत्सारीत भाग)- २४६.०० मीटर, उजवा अनुत्सारीत भाग-१०५.०० मीटर अशी एकूण धरणाची लांबी ७३० मीटर बांधण्याचे प्रस्तावित आहे. उर्त्सारित भागामध्ये १५ मीटर x १२ मीटर आकाराचे एकूण १३ वक्राकार दरवाजे प्रस्तावित आहेत तसेच मुख्य कालवा एकूण ३८.६५ कि.मी. लांबीचा असून संपूर्ण लांबीत अस्तरीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्प हा चाळीसगांव पासुन २५ कि.मी. अंतरावर व जळगांव पासुन १२५ कि.मी. अंतरावर आहे.

सदर प्रकल्पाद्वारे तापी खोऱ्यामध्ये महाराष्ट्रास अनुज्ञेय असणाऱ्या १९१ अ.घ.फू. पाणी वापरापैकी ३९.६२८ द.ल.घ.मी. (१.४०अ.घ.फू) पाणी वापर होणार आहे. सदर प्रकल्पामुळे चाळीसगांव तालुक्यातील २० गावांना ६२८५.५८ हेक्टर आणि भडगांव तालुक्यातील ११ गावांचे १२५६.४२ हेक्टर असे एकुण ७५४२ हेक्टर सिंचन क्षेत्रास (I.C.A.) प्रवाही उजवा मुख्य कालव्याव्दारे सिंचनाचा लाभ होणार आहे.

प्रकल्पाच्या एकूण ३९.६२८ द.ल.घ.मी.(१.४० अ.घ.फू.) पाणी वापरापैकी ३४.९८८ द.ल.घ.मी. (१.२४ अ.घ.फू.) पाणी सिंचनासाठी व बाष्पीभवन व्यय ४.६४ द.ल.घ.मी.(०.१६ अ.घ.फू.) असा होणार आहे.

वरखेडे लोंढे बॅरेज मध्यम प्रकल्पास संदर्भ क्र.१ नुसार सन १९९७-९८ चे दरसूचीवर आधारीत रू.७५.६३ कोटी (रूपये पंचाहत्तर कोटी त्रेसष्ठ लक्ष फक्त) इतक्या रकमेस मूळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. संदर्भ क्र.२ नुसार सन १९९९-२००० दरसुचीवर आधारित रू. १६१.८५ कोटी( रू.एकशे एकसष्ठ कोटी पचांऐशी लक्ष फ़क्त) इतक्या रकमेस नव्याने मुळ प्रशासकीय मान्यता वक्राकार दरवाज्यांच्या संकल्पनातील बदलामुळे प्रदान करण्यात आली होती. संदर्भ क्र.३ नुसार सन २००३-०४ दरसुचीवर आधारित रू १८६.९१ कोटी ( एकशे शहाऐंशी कोटी एक्यान्नव लक्ष फक्त) इतक्या रकमेस धरणाची संरेखा ४०० मीटर खालील बाजूस सरखवली असल्यामुळे नव्याने मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती . संदर्भ क्र. ४ इतक्या रकमेस सन २००७-०८ दरसुचीवर आधारित रू. २३६.०२ कोटी ( रूपये दोनशे छत्तीस कोटी दोन लक्ष फक्त) प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचे संदर्भ क्र.५ अन्वये सन २०१४-१५ चे दरसूचीवर आधारीत रु.५२६.६४ कोटी किंमतीचा द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मान्यतेस्तव शासनास सादर करण्यात आला होता. प्रकल्पाचे लाभ व्यय गुणोत्तर २.६० येत असून प्रकल्प मापदंडात बसतो.

सदर प्रकल्पाच्या रू. २३६.०२ कोटी किमतीच्या प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता किमतीच्या तुलनेत व्दितीय सुधारित प्रकल्प अहवालाची किंमत रू. २९०.६३ कोटीने जास्त आहे. किंमत वाढीचे सविस्तर प्रमुख कारणे पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाब | वाढ (रुपये कोटी) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | दरसूचीतील वाढीमुळे | ७१.८१ |
| २ | निविदा स्विकृतीमुळे | १५.५७ |
| ३ | भूसंपादन किंमतीतील वाढ | २५.३५ |
| ४ | इतर कारणांमुळे झालेली वाढ | ३६.९३ |
| ५ | संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ | ६०.४९ |
| ६ | क्षेत्रिय परिस्थितीमुळे झालेली वाढ | ३६.३४ |
| ७ | मंजूर प्रकल्प अहवालात बाबींच्या सुटलेल्या तरतुदीमुळे झालेली वाढ | ४४.१४ |
| | एकुण वाढ | २९०.६३ |

तापी खेऱ्यातील राज्याच्या हिश्याचे १९१.४० अ.घ.फू. अनुज्ञेय पाणी वापरातील १.४० अ.घ.फू. पाणी वापर या प्रकल्पातून होणार आहे. सद्या हे पाणी गिरणा नदीतून वाहून जाऊन तापी नदीस मिळून विना वापर गुजरात मध्ये वाहून जाते. त्यामूळे सदर पाण्याचा वापर होण्याच्या दृष्टीने या प्रकल्पाच्या द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता देणेचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन होता.

नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने सदर प्रस्ताव दि.१५/०२/२०१८ रोजी च्या व्यय अग्रक्रम सहमतीच्या पूढे विचारार्थ ठेवला असता व्यय अग्रक्रम समितीने प्रकल्पाच्या किंमत वाढीचे कारणे, प्रकल्पाची सद्यस्थिती व प्रकल्प पूर्ण करण्याची निकड विचारात घेऊन प्रस्तावास मान्यता दिली.

**<u>शासन निर्णय</u> :-**

शासन आता या निर्णयाव्दारे तापी खोऱ्यातील वरखेडे लोंढे (बॅरेज) मध्यम प्रकल्पाच्या सन २०१४-१५ च्या दरसूची वर आधारीत रु.५२६.६४ कोटी (रुपये पाचशे सव्वीस कोटी चौसष्ठ लक्ष फक्त) इतक्या किंमतीच्या द्वितीय सुधारित प्रकल्प अहवालास प्रशा़सकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यापैकी रु.४६५.८६ कोटी (रुपये चारशे पासष्ठ कोटी सह्याऍशी लक्ष फक्त) कामाप्रित्यर्थ व रु.६०.७८ कोटी (रुपये साठ कोटी अठ्ठ्याहत्तर लक्ष फक्त) आस्थापना व इतर अनुषंगिक खर्चासाठी तरतूद आहे. सोबत **परिशिष्ठ** मध्ये उपशिर्षवार सुधारित तरतूदींचा गोषवारा दिलेला आहे.

२. या योजनेस प्रदान केलेली द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता मध्यम प्रकल्प कार्यसनाच्या नोंदवहीमध्ये अनुक्रमांक ०१/ २०१८ वर नोंदवण्यात आली आहे.

३. सदर प्रकल्पाचे उर्वरित काम नियोजित वेळेत व सुधारित प्रशासकीय मान्यता तरतूदीच्या मर्यादेत पूर्ण करण्यात यावे.

४. या योजनेच्या कामावर होणारा खर्च मागणी क्रमांक- आय-५, ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्प यावरील भांडवली खर्च,८०-सर्वसाधारण, १९०-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका (०२) योजनांतर्गत, (०२) (०४) तापी पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (४७०१-एच ७६३) या लेखाशिर्षाखाली टाकावा व त्याखालील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

५.१ सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयी करण्याच्या विविध टप्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहित धरता येणार नाही.

५.२ या प्रकल्पाबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशीची कार्यवाही पूढे चालू ठेवावी . द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निणर्यामूळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही.

५.३ आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय प्रकल्पात समावेश करण्यात येऊ नये.

५.४ प्रगतीपथावरील निविदांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. पाणीसाठ्याचा सिंचनाकरिता जास्तीत जास्त लाभ होईल अशा प्रकारे उर्वरित कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा व त्यानुसार कामे/निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

५.५ प्रकल्पाचे काम जून २०२१ पर्यंत पूर्ण करण्यात यावे .

६. सदर शासन निर्णय, नियोजन विभागाचे अनौपचारीक संदर्भ क्र ९०/का.१४३४ दि.०१/०४/२०१७, वित्त विभागाचे अनौपचारीक संदर्भ क्र.२४१/२०१७/व्यय १२, दि.२३/१०/२०१७ व दि.१५/०२/२०१८ रोजी झालेल्या व्यय अग्रक्रम समितीच्या बैठकीतील अभिप्रायानुसार व वित्त विभागाचे दि.२७/०२/२०१८ रोजीच्या पत्राच्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०३०९१०३४४३५५२७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sharad Arjunrao Kosare

Digitally signed by Sharad Arjunrao Kosare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0b891a07025d131f2e4dbdad421ed28730e65ccbd1805f12d7d2a36728117dc1, serialNumber=84b79d78a5b59be501a2af32dfd3178c986e0f714258097280f2201b3f387450, cn=Sharad Arjunrao Kosare
Date: 2018.03.09 10:49:33 +05'30'

**सहपत्र :- परिशिष्ट**

**( श.अ.कोसारे )**
शासनाचे अवर सचिव

**प्रत, सहपत्रांसह :-**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४) मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५) मा.मुख्य सचिव, यांचे स्विय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
११) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर.
१२) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव.

१३) मुख्य अभियंता (द.व प्र) व सहसचिव यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

१४) मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव.

१५) उपसचिव (मो.प्र-१/ मो.प्र-२/जसं/निवसं/सिं.व्य./ज.वि./लाक्षेवि), यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६) आंतरवित्त सल्लागार व उपसचिव यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

१७) अधिक्षक अभियंता, जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगाव.

१८) कार्यकारी अभियंता, जळगाव मध्यम प्रकल्प विभाग क्र.२, जळगाव.

१९) वित्त विभाग ( व्यय-१२/ अर्थ-०२/अर्थ-१०/व्यय-६ अ ), मंत्रालय, मुंबई.

२०) नियोजन विभाग (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई.

२१) मध्यम प्रकल्प कार्यासन संग्रहार्थ.

## परिशिष्ठ

**वरखेडे लोंढे बॅरेज मध्यम प्रकल्प, ता.चाळीसगाव, जि.जळगाव**
**शासन निर्णय क्र. सुप्रमा-२०१५/१३७/(प्र.क्र.१५४/१५)/म.प्र.,दि.०९ /०३/२०१८ चे सहपत्र.**
**सुधारित अंदाजपत्रक उपशीर्षवार तरतुदी ( द्वितीय सुप्रमा )**

| अ.क्र. | उपशिर्ष | द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रक (रुपये कोटी) |
|---|---|---|
| १ | अे -प्राथमिक | ३.३० |
| २ | बी- भूसंपादन | ७९.९९ |
| ३ | सी- कामे | २९२.०२ |
| ४ | डी- विमोचक | १.०८ |
| ५ | इ- प्रपात | ०.०० |
| ६ | एफ- आर एच टी कामे | २३.५० |
| ७ | जी- पुल | १३.९३ |
| ८ | एच- एस्केप | १.१२ |
| ९ | के- इमारत | ४.३६ |
| १० | एल- मातीकाम | १४.३३ |
| ११ | एम-वृक्षारोपण | ०.६९ |
| १२ | ओ- संकिर्ण | २.२४ |
| १३ | पी- देखभाल व दुरुस्ती | ५.१८ |
| १४ | क्यू- हत्यारे व संयत्रे | ०.२२ |
| १५ | आर- दळणवळण | १.९० |
| १६ | यु-वितरीका | १६.९८ |
| १६ | एक्स-पर्यावरण | ५.०२ |
| **१७** | **एकूण कामाप्रित्यर्थ** | **४६५.८६** |
| **१८** | **आस्थापना व अनुषांगिक खर्च** | **६०.७८** |
| | **एकूण** | **५२६.६४** |